MHKO070009342023

## रे.दि.मु.नं. ११०/२०२३ मधील नि.४२ खालील आदेश

प्रस्तुत अर्ज वादी क्र.४ ने, वादी क्र.१ चे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. वादी क्र.४ चे कथन की, वादींनी प्रस्तुतचा प्रातिनिधीक स्वरुपाचा दावा हक्कज्ञापन व कायम मनाईकरिता दाखल केला आहे. दावा चालू असताना वादी क्र.१ चंपाबाई शंकर कांबळे ही दि.०२/०२/२०२५ रोजी मयत झाली आहे. वादी क्र.४ ला कायद्याचे ज्ञान नसल्याने वकिलांना माहिती दिली नसल्याने व वादी क्र.१ मयत झाल्याचे तिचे नातूकडून समजल्याने वारस अभिलेखावर आणता आले नाहीत. त्यामुळे त्यांना १ महिना ५ दिवसांचा विलंब झालेला आहे. सदरचा विलंब त्यांनी जाणुनबुजून केलेला नाही. तसेच सदरचा दावा हक्कज्ञापन व कायम मनाईकरिता असल्याने मयत वादी क्र.१ चे वारस दाव्यामध्ये अभिलेखावर न आल्यास वादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. तरी सदर विलंब माफ व्हावा अशी विनंती केली.

३. सदर अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे देवून असे कथन केले की, अर्जास कोणतेही संयुक्तीक कारण दिलेले नाही. तसेच, अर्जाचे पुष्ट्यर्थ प्रतिज्ञापत्र दिलेले नसल्याने अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादीतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दावा चालू असताना वादी क्र.१ ही दि.०२/०२/२०२५ रोजी मयत झाली आहे. मयत वादी क्र.१ चे वारस मुदतीत अभिलेखावर घेणे आवश्यक होते. परंतु, वादी क्र.४ ला कायद्याचे ज्ञान नसल्याने वकिलांना

माहिती दिली नसल्यामुळे व वादी क्र.१ मयत झाल्याचे तिचे नातूकडून समजल्याने वादी क्र.४ ला मुदतीत वारस अभिलेखावर आणता आले नाहीत. वादीने प्रस्तुतचा प्रातिनिधीक स्वरुपाचा दावा हक्कज्ञापन व कायम मनाईकरिता दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये वादी क्र.१ हे आवश्यक पक्षकार होते. सदर वादी क्र.१ च्या मृत्यूनंतर त्याचे वारसांच्या रुपात तिचा दावा मिळकतीमध्ये असणारा हक्क व अधिकार जीवंत राहाणार आहे. अशा परिस्थितीत दाव्याचा संपूर्णपणे व कायमस्वरुपी न्यायनिर्णय होणेकामी मयत वादी क्र.१ चे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होणे आवश्यक आहे. प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास वादी व प्रतिवादी यांचेतील मुळ वाद संपुष्टात येणार नाही व नवीन दावे दाखल होण्याची शक्यता निर्माण होणार आहे.

५. प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे कसलेही नुकसान होणार नाही. याउलट, प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास वादी क्र.१ च्या वारसांचे अपरिमीत नुकसान होणार आहे. त्यामुळे वादी क्र.१ चे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करणे योग्य होईल. सबब, मी खालील आदेश पारीत करत आहे -

**<u>आदेश</u>**

१. वादी क्र.१ चा अर्ज (नि.४२) मंजूर करणेत येतो.
२. वादी क्र.४ ला वादी क्र.१ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करणेत येतो.

PRASHANTKUMAR ASHOK PATIL

Digitally signed by PRASHANTKUMAR ASHOK PATIL
Date: 2025.08.13 15:59:13 +0530

**(पी.ए.पाटील)**

दिनांक १३/०८/२०२५.

सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
जयसिंगपूर